**दिवाणी दावा क्र.७३/२०१२**
अनुसया थोरस वि. बाळकृष्ण नाडर
नि.क्र. १६० व १७८ वरुन

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ नामे अनुसया रिचर्ड थोरस यांचा शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादी क्र.३ यांचे विधीज्ञ श्री. एस.यु.माविनकुर्वे यांचेमार्फत</u>**

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द क्रिमिनल कम्प्लेंट दाखल केली आहे. त्या प्रकरणामध्ये माझी उलटतपासणी झाली आहे. प्रतिवादी क्र.३ माझी बहिण ही ए ॲण्ड एन जनरल ट्रेंडीग या कंपनीमध्ये भागीदार असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फौजदारी प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.३ ही त्या कंपनीमध्ये भागीदार असल्याचे सांगितले परंतु आजरोजी येथे प्रतिवादी क्र.३ त्या कपंनीची भागीदार असल्याचे मला माहित नाही म्हणुन मी खोटे सांगत आहे.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ही १९९५ साली भारतात आल्यानंतर मी तिच्यासमोर कबुल केले होते की, मी तिची फसवणुक केली आहे त्यामुळे वादमिळकत मी तिच्या नावे करुन देणेबाबत तिला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९५ साली मी माझे शपथपत्र करुन दिले होते व त्यामध्ये फसवणुकीसंदर्भात व मिळकत ही प्रतिवादी क्र.३ च्या नावे करुन देण्यासंदर्भातील मजकुर नमुद होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याचे विरुध्द दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणामध्ये नि.क्र.२९ अन्वये ते शपथपत्र प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ हि परदेशात असल्याने तिच्या सांगण्यावरुन मी वाद मिळकतीचा ताबा प्रतिवादी क्र.१ ला दिला होता.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याला मी वाद मिळकतीचा ताबा प्रतिवादी क्र.३ हिचे सांगणेवरुन दिला होता. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, प्रतिवादी क्र.१ याला वादमिळकतीचा ताबा मी स्वतःहुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.३ हिचे परवानगीने वाद मिळकतीवर राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९० साली प्रतिवादी क्र.३ हिचे परस्पर वादी मिळकत

माझे नावावर करुन घेतले. सन २०१२ साली प्रतिवादी क्र.३ भारतात आल्यानंतर ती वाद मिळकतीवर राहावयास लागली याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.३ हि परदेशात असताना तिच्या परवानगीने वाद मिळकतीवर राहत असल्याने प्रतिवादी क्र.३ ही सन २०१२ साली परदेशातुन भारतात परत आल्यानंतर प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.३ हिला वाद मिळकतीचा ताबा दिला व त्या संदर्भात ताबा दिलेबाबत प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.२३६ वर प्रतिज्ञापत्र करुन दिले. प्रतिवादी क्र.३ ही या प्रकरणातध्ये वाद मिळकतीची ती ताबेदार असल्यामुळे प्रकरणात तिला पक्षकार म्हणुन समाविष्ठ करुन घेणेबाबत अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ हिचे विरुध्द मी त्यानंतर कोणतीही कम्प्लेंट केलेली नाही.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, सन १९९८ साली वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र.३ हिने तिच्या नावाने लाईटमिटर घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१२ सालापासुन ते आजपर्यंत प्रतिवादी क्र.३ ही वाद मिळकतीचे लाईट बिल भरत आहे. मी आजपर्यंत वाद मिळकतीचे लाईट बिल भरले नाही याबाबत मला माहित नाही. सन २०१२ पासुन ते आजपर्यंत वाद मिळकतीचे मालमत्ता कर हे प्रतिवादी क्र.३ हिने भरल्याचे मला माहित नाही. सन १९९५ सालापासुन ते आजपर्यंत वाद मिळकतीचे मालमत्ता कर मी भरल्याचे मला माहित नाही. सन २०१२ पासुन ते आजपर्यंत वाद मिळकतीचे मालमत्ता कर मी भरले नाही.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, सन १९८९ साली झालेल्या खरेदीखताचे वेळी व प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द केलेले फौजदारी प्रकरणाच्या वेळी माझे विधिज्ञ श्री. मोहनराव डोंगरे हे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व विधिज्ञ श्री. मोहनराव डोंगरे यांनी आम्ही दोघांनी मिळुन प्रतिवादी क्र.३ हिला फसवुन वाद मिळकतीचे खरेदी खत माझे नावावर करुन घेतले.

| | |
|---|---|
| **प्रश्न** | प्रतिवादी क्र.३ हिने माझ्या विरुध्द, विधिज्ञ श्री. डोंगरे, माझे पती व सुधनवा नाईक यांचे विरुध्द लेखी तक्रार दिली होती. |
| **उत्तर** | आमच्याविरुध्द लेखी तक्रार दिली होती परंतु ती तक्रार फसवणुकीची नव्हती. |

१८. हे म्हणणे खरे आहे की, परेश पाटील हे माझे विधिज्ञ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, विधिज्ञ श्री. परेश पाटील हे माझे सांगणेवरुन वाद मिळकतीवर जात होते. प्रतिवादी क्र.३ हिने परवानगी घेवुन वाद मिळकतीवरील झाडे कापलेबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ ने वाद मिळकतीची व तिच्या बाजुचे शेजारी यांचे मिळकतीची मोजणी केली त्याबाबत वरीष्ठ स्तर न्यायालय, पुणे येथील प्रकरणात प्रतिवादी क्र.३ ही पक्षकार होती व मी पक्षकार नव्हते याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयाचे दिशाभुल करणेकामी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.३ हिचे विरुध्द मी फसवणुक केली असुन त्या फसवणुकीचा गैरफायदा घेत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

पिंपरी, पुणे
दिनांक :-२०.०२.२०२५

(श्रीमती. एस.एस.चव्हाण )
**२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**पिंपरी, जि. पुणे.**